# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Thieves**

**Police Station** :- **WashimCity**

**Date of Good Work done** :- **08/02/2023**

**Brief of the work done :-**

ATM फोडण्याच्या प्रयत्नातील 02 चोरट्यांना रंगेहाथ अटक ; #बीट_मार्शल यांच्या प्रभावी रात्रगस्ती मुळे चोरीस आळा.

# सराफा लाईनमधील ATM फोडण्याच्या प्रयत्नातील ०२ आरोपींना रंगेहात अटक

**पब्लिक पोस्ट प्रतिनिधी**

**वाशीम:** चौकीदाराच्या जागरूकतेमुळे व पोलीसांच्या कार्यतत्तरतेमुळे पो.स्टे.वाशिम शहर हद्दीतील सुभाष चौक परिसरात असलेल्या सराफा लाईन मधील ATM फोडण्याच्या प्रयत्नात असलेल्या ०२ चोरट्यांना रंगेहात पकडण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे. दि.०७.०२.२०२३ रोजी रात्री ०२.३० वाजताचे सुमारास पो.स्टे.वाशिम शहरचे बीट मार्शल क्र.०१ चे अंमलदार प्रदीप बोडखे, ब.क्र.४१४ व संदीप वाकुडकर ब.क्र.३०३ हे रात्रगस्त करत असतांना सुभाष चौकातील



सराफा लाईन येथील HDFC ATM मध्ये चोरी करण्याच्या प्रयत्नातील चोरटे त्यांना दिसले. त्याठिकाणी चौकीदार असलेले प्रमोद उखळकर व पोलीस अंमलदार प्रदीप बोडखे व संदीप वाकुडकर यांनी समन्वयाने त्या ०२ आरोपींना रंगेहाथ पकडले. सदर आरोपी हे सुभाष चौकातील HDFC बँकेच्या ए.टी.एम.चा दरवाजा ओढून त्याचे लॉक तोडून चोरी करण्याच्या प्रयत्नात होते. पोलीसांच्या प्रभावी पेट्रोलिंग व रात्र गस्त मुळे त्यांचा चोरीचा प्रयत्न फसला. सदर आरोपींविरुद्ध पो.स्टे.वाशिम शहर येथे अप.क्र.६९/२३, कलम ३८०, ४५७, ५११, ३४ भादंविनुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे. सदर कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांच्या मार्गदर्शनाखाली रफिक शेख, ठाणेदार, वाशिम शहर, सपोनि.ताठे, पोकॉ. प्रदीप बोडखे, संदीप वाकुडकर, सतीश बांगर यांनी पार पाडली.